# दासबोधातील उत्तम लक्षण व वैचारिक निरुपणाचे आजच्या काळाच्या संदर्भातील महत्व

**प्रा. डॉ. सुजय बाबुराव पाटील**, मराठी विभाग प्रमुख,कमला कॉलेज, कोल्हापूर. मो. ८४२१६६८४०६
ई मेलः sujaybpatil@rediffmail.com

**प्रस्तावना**

सतराव्या शतकातील महाराष्ट्रातील एक महत्वाचे संत कवी म्हणून 'समर्थ रामदास स्वामी' यांचा उल्लेख करावा लागतो. दासबोध, करुणाष्टके, मनाचे श्लोक, आरत्या इ. साहित्याची निर्मिती करुन रामदास स्वामींनी समाजमनाचे शारीरिक, मानसिक, बौध्दिक व अध्यात्मिक पातळीवर भरणपोषण केलेले आहे. यापैकी मानवी जीवनाच्या कल्याणासाठी सर्व पातळीवर मार्गदर्शन करणारा ग्रंथराज दासबोध सर्वकालिक आहे. आजच्या आधुनिक म्हणविणाऱ्या काळातही दासबोधातील विचार आदर्श समाज रचनेसाठी मार्गदर्शन ठरतात.

**दासबोधातील उत्तम लक्षण निरुपण**

समाज जीवनात वैचारिक मतभेद असू शकतात. वैचारिक मतभेद हे समाजाच्या जीवंतपणाच लक्षण मानले जाते. पण काही लोकांना पोकळ वादविवाद घालण्यात, वादंग मागविण्यात नेहमी धन्यता वाटते. असा निरर्थक वाद घालणाऱ्या व्यक्तीपासून समाज सावध राहतो. अशा व्यक्तीमुळे आपलं मानसिक स्वास्थ बिघडू नये म्हणून त्याला दक्षतेन टाळलं जाते. परिणामी निरर्थकवाद घालणारी व्यक्ती समाजात एकटी पडली जाते. सर्वांच्या तिरस्काराचा विषय बनते या संदर्भात मार्गदर्शन करताना समर्थ दासबोधाच्या दुसऱ्या दशकात लिहितात.

"तोंडाळासी भांडो नये। वाचाळासीं तंडो नये।
संतसंग खंडूं नये। अंतर्यामी।
अति क्रोध करु नये। जिवलगासी खेदूं नये।
मनीं वीट मानू नये। सिकवणेचा।।"[१]

घरामध्ये आजी, आजोबा, आईवडील व मुल अशी तीन पिढीचे प्रतिनिधी असतात. या तिघांच्यामध्ये सर्व पातळीवर योग्य समन्वय, वैचारिक समंजस भूमिका असेल तर घरात शांतता ही निश्चितच नांदते.

पण ज्यावेळी माझंच खरं! मी म्हणतो तेच बरोबर! अशा प्रकारचा अट्टाहास सुरु होतो. घरातील शांतता भंग पावू लागते. तीन पिढयांची तोंड तीन दिशेला होतात. परिणामी कुटुंब आर्थिक व मानसिकदृष्टया दुभंगण्याची दाट शक्यता निर्माण होते.

या पार्श्वभूमीवर कुटुंबाची एकसंघता राहण्यासाठी कुटुंबातील लहान थोरांनी आपापले स्वभाव, वृत्ती प्रवृत्ती यांना समंजसपणे मुरड घालून सुसंवाद साधावा यातच कुटुंबाच व पर्यायाने समाजाचं भलं होईल. या दृष्टिकोनातून दासबोधातील पुढील विचार खूपच मार्गदर्शक वाटतात.

'बहुतांचे अन्याये क्षमावे। बहुतांचे कार्यभाग करावे।
आपल्यापरीस व्हावे। पारखे जन।।
दुसऱ्याचे अंतर जाणावे। तदनुसारचि वर्तावे।
लोकांस परीक्षित जावे। नाना प्रकारे।।
नेमकेची बोलावे। तत्काळचि प्रतिवचन द्यावे।
कदापी रागास न यावे। क्षमारुपे।।
आलस्य अवघाच दवडावा। येता उदंडचि करावा।
शब्दमत्सर न करावा। कोणी येकाचा।।
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा। शब्द निवडून बोलावा।
सावधपणे करीत जावा। संसार आपला।।[२]

भाषेत मृदूता व मधुरता असणं, दुसऱ्याचे अंतःकरण दुखावणार नाही याची दक्षता घेत आपली वर्तुणुक ठेवणं. खोटेपणाचा लवलेश नसणारी नम्रता. दुसऱ्यासाठी सदैव मदतीचा हात पुढं करण्याची वृत्ती. स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा आदर. नवनवीन शिकण्याची ओढ या सर्वगुणांना रामदासस्वामी 'सदेवलक्षण' म्हणून गौरवितात. या गोष्टी ज्या व्यक्तीजवळ असतात ती व्यक्ती आपल्या कुटुंबाबरोबर समाजात देखील आदरास पात्र ठरते. अशा व्यक्तीनं समाजहितासाठी केलेल्या आवाहनाला नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळतो त्यामुळेच समर्थ लिहितात की,

"आपल्या कार्यास तत्पर। लोक असती लहान थोर।
तैसाचि करी परोपकार। मनापासुनी।।
दुसऱ्याच्या दुःखे दुखवे। दुसऱ्याच्या सुखे सुखावे।
आवघेचि सुखी असावे। ऐसी वासना।।
उदंड मुले नानापरी। वडिलांचे मन अवघ्यांवरी।
तैसी अवघ्यांची चिंता करी। माहांपुरुष।।
लोकी अत्यंत क्षमा करिती। आलियां लोकांचे
प्रचिती। मग ते लोक पाठी राखती नाना प्रकारी।।"[३]

**दासबोधातील वैचारिकतेविषयीचे निरुपण**

विचार करण्याची शक्ती माणसाला लाभलेली देणगी आहे. मानवी जीवनास उपकारक ठरणारी प्रत्येक गोष्ट सदविचारातून निर्माण झालेली आहे. विचार प्रवण प्रत्येक कृतीला समर्थ महत्व देतात. विचार न करता जी कृती केली जाते ती व्यर्थ होते. म्हणून सामाजिक कार्यात विचाराला फार महत्व आहे हे सांगताना समर्थ लिहितात.

"विचार न करितां जें जें केले।
तें तें वाऊगे वेर्थ गेले।
म्हणोनि विचारी प्रवर्तले। पाहिजते आधी।।
बहुरत्ना वसुंधरा। कोण खोटा कोण खरा।
अवघें कळे विचारा। रुढ होता।।"[४]

ज्या गोष्टी विषयी आपल्याला ज्ञान नाही त्या विषयी आपणास निर्णय घेण्याचा प्रसंग आला तर आपण आंधळेपणान कोणताही निर्णय न घेता त्या विषयाचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीचा सल्ला घ्यावा. अशा ज्ञानी व्यक्तीचा उल्लेख समर्थ 'जाणता' असा करतात.

बऱ्याच वेळेला समाजात अस दिसून येतं की, 'त्याला काय कळतं?' 'तो कोण शहाणा लागून गेला काय?' अशा आविर्भावात आपण 'जाणत्या' व्यक्तीचा सल्ला घेत नाही परिणामी पुढं अनर्थ घडतो. त्यामुळेच समर्थ लिहतात.

"ऐकल्याविण कळलें। शिकविल्याविण शहाणपण आले।
देखिले ना ऐकिले। भूमंडळी।।
जे आपणास नव्हे ठावे। ते जाणतयास पुसावे।
मनोवेगे तने फिरावे। हे तो घडेना।।"[५]

जे विचारपूर्वक आपल्या आयुष्याचे ध्येय ठरवितात त्यासाठी योग्य मार्गाने प्रयत्न करुन पुढे जातात तेच यशस्वी जीवनाचा आस्वाद घेऊ शकतात. आईवडिलांनी आपल्या संसाराविषयी विचारपूर्वक घेतलेला निर्णय मुलांच्या भवितव्यावर चांगला परिणाम घडवितो. मुलांनी आपल्या अभ्यासक्षेत्राविषयी विचारपूर्वक घेतलेला निर्णय त्यांचे भवितव्य उज्ज्वल करतो. विचारपूर्वक कृतीने सुखा समाधानाचं आयुष्य लाभते. अविचारान जगणाऱ्याच्या नशिबी कष्टांचाच भार येतो हे सांगतात समर्थ लिहितात.

"जयांस आहे विचार। ते सुकासनी जाले स्वार।
इतर जवळील भार। वाहातचि मेले।।[६]

जिथं विचारांची बैठक नसते तिथं प्रत्येक गोष्टीत विस्कळीतपणा, धरसोडवृत्ती, अस्थिरता येत राहते. अशा व्यक्तीकडून स्वतःचे अथवा समाजाचेही भल होत नाही हा विचार मांडताना समर्थ लिहितात—

"विद्या उदंडचि सिकला। प्रसंगमान चुकतचि गेला।
तरी मग तये विद्येले कोण पुसे।।
आकलबंद नाही जेथे। अवघेचि विस्कळित तेथे।
येके आकलेविण ते। काये आहे।।"[७]

जिथं विचाराला स्थान नसते तिथं आचरणा संदर्भातील नैतिकता संपते. परिणामी विवेकाला तिलांजली मिळते. अशा वेळी व्यक्तीच्या हातून लोभापायी भ्रष्टाचार सुरु होतो. समाज अधःपतनाकडं वळतो. सर्वत्र अज्ञानाचा अंधःकार माजतो. खरं बाजूला राहतं व खोटयाचा बोलबाला सुरु होतो. ही गोष्ट व्यक्ती आणि समाजाला घातक ठरते त्यामुळेच समर्थ लिहितात—

'जे विचारापासून चेवले। ते आचरणापासून भ्रष्टले।
विवेक करु विसरले। विषय लोभी।।
नाही सारासार विचार। तेथे अवघा अंधकार।
खरे सोडून खोटे पोर। नेणते घेते।।'[८]

**समारोप**

समर्थांनी दैनंदिन जीवनातील, लोकव्यवहारातील विविध उदाहरणे देऊन विविध विषयांसंदर्भात केलेले निरुपण हे समाज उभारणीत मोलाचे योगदान देणारे आहेत. हे याची नोंद बदलत्या काळातील प्रत्येक अभ्यासकांनी घेणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

- समर्थांचे लेखन हे समाज प्रबोधनाच्या तळमळीतून झालेले दिसते.
- आदर्श व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत दासबोधातील उत्तम लक्ष्मण निरुपण प्रत्येकाला मार्गदर्शक ठरणारी आहेत.
- विचार कसा करावा, विचाराला बैठक कशी द्यावी या संदर्भात दासबोधातील 'विचार निरुपण' आज ही मार्गदर्शक ठरणारे आहे. व्यक्तिच्या वैचारिकतेला विवेकाचे भान देणारे हे निरुपण आहे.
- आजची ढासळणारी कुटुंबसंस्था, मूल्य व्यवस्था यांना सांभाळण्याचे काम दासबोधातील विचार करु शकतील असे वाटते.

**संदर्भ टिपा**

१) सार्थ दासबोध – दशक दुसरा– समास दुसरा, पृ. क्र. ५२, सार्थ श्रीमत दासबोध लेखकः प्रा. के. वि. बेलसरे.
२) सार्थ दासबोध – दशक बारावा, समास दहावा, पृ. क्र. ७०६, सार्थ श्रीमत दासबोध, लेखकः प्रा. के. वि. बेलसरे.
३) सार्थ दासबोध – दशक एकोणविसावा, समास चौथा, पृ.क्र. ९८०.
४) सार्थ दासबोध – दशक दहावा, समास नववा, पृ.क्र. ६१६.
५) सार्थ दासबोध – दशक अठरावा, समास दहावा, पृ.क्र. ९६२.
६) सार्थ दासबोध – दशक सहावा, समास नववा, पृ.क्र. ३४०.
७) सार्थ दासबोध – दशक बारावा, समास तिसरा, पृ. क्र. ६७८.
८) सार्थ दासबोध – दशक बारावा, समास सातवा, पृ.क्र. ६९४.

**संदर्भ ग्रंथ**

१) सार्थ श्रीमत दासबोध–
लेखक – प्रा. के. वि. बेलसरे
प्रकाशक– श्री. समर्थ सेवा मंडळ
बाविसावी आवृत्ती – सन २०१०.
२) समर्थांचा प्रपंचबोध
लेखक – यशवंत जोगळेकर
प्रकाशक – मधुश्री प्रकाशन
प्रथम आवृत्ती– १५ एप्रिल २००७.
३) श्रीमत दासबोध अंतरंग
लेखक– श्री अविनाश पवार
प्रकाशक – कुणाल हजेरी – चेतक बुक्स, पुणे
प्रथम आवृत्ती – २६ जून २०१३.